# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ / फॅक्स २५६५६२३४ Email : ~~jdtepu@pn3.vsnl.net.in~~. ** Web.ropune.org.in


जा क्र : तंशिविकापु/विवि/२००९/ १७०९ | दिनांक :१८/०९/२००९

19 SEP 2009

प्रति,

प्राचार्य
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील
शासकीय /शासकीय अनुदानीत / विना अनुदानीत
पदवी / पदविका /अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र /
वास्तूशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट व तत्सम संस्था

विषय :- स्वाईन फल्यू या संसर्गजन्य बाधीत रोगाची बाधीत विद्यार्थ्यांची माहिती पाठविणेबाबत.

संदर्भ :- आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचे पत्रं क्र ससंआसे/स्वाईन फल्यू नियंत्रण सेल /२१०३ /कक्ष-५८/०९ दिनांक १७/०९/२००९.

पुणे शहरामध्ये तंत्रशिक्षण विभागांतर्गत ४ संस्थामधील विद्यार्थ्यांना स्वाइन फल्यूची बाधा झाल्याचे दिसून आले आहे. त्या अनुषंगाने संस्था प्रमुखांना कळविण्यात येते की, स्वाइन फल्यू बाधीत विद्यार्थ्यांविषयी माहिती तारखेनिहाय घेण्यात यावी. तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना टॅमिफल्यू औषधोपचार झाला आहे किंवा नाही हे पहाण्यात यावे. वर्गातील व तसेच महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांना स्वाईन फल्यूचा संसर्ग झाला आहें काय ? हे पाहण्यात यावे. सर्दी, ताप, खोकला, धसा दुखणे ही संशयीत स्वाइन फल्यूची लक्षणे आहेत. महापालिकेच्या क्षेत्रातील महाविद्यालयात स्वाइन फल्यू बाधीत विद्यार्थी असल्यास महानगरपालिकेच्या आरोग्य अधिका-यांना व ग्रामीण भागातील संस्था असल्यास जिल्हा आरोग्य आधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांना त्वरित दूरध्वनीव्दारे तसेच लेखी कळविणे आवश्यक आहे. त्यांचेकडून वैद्यकीय पथक मागवून घेऊन संपूर्ण महाविद्यालयाची तपासणी करण्यात यावी.

भविष्यात इतर महाविद्यालयात स्वाईन फल्यूचे बाधीत रुग्ण आढळल्यास अतित्वरीत युध्दपातळीवर संबंधित अधिका-यांना कळविणे आवश्यक आहे. स्वाईन फल्यू संशयित विद्यार्थ्यांची तपासणी वेळेत न झाल्यास व त्यांचा औषधोपचार वेळेत न केल्यास त्यांना स्वाईन फल्यू बळावण्याची शक्यता वाढेल. तसेच कॉलेज विद्यार्थ्यांमधील सहवासितांची व त्यांचे घरातील सहवासितांची तपासणी करुन औषधोपचार न केल्यास स्वाईन फल्यू पसरण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे संस्था प्रमुखांनी दररोज विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत दक्ष असणे अतीशय आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

उपरोक्त संदर्भा मधील सूचनेनुसार सर्व संस्थांनी खाली दिलेल्या प्रपत्रामध्ये माहिती भरून ती रोजच्या रोज या कार्यालयास इ मेलने पाठविणे आवश्यक आहे. सदरची माहिती संकलीत करुन मा जिल्हाधिकारी यांना सादर करावयाची आहे .तसेच या कामासाठी एका स्वतंत्र अधिकारी यांची नेमणूक करून त्याचे नाव, हुद्दा व मोबाइल नंबर या कार्यालयास कळविण्यात यावा.

** सदरची माहिती ropune.swineflue@gmail.com या E-Mail Address वर पाठवावी.

(डी एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री शिंदे एस. बी., प्रोग्रॅमर यांना कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

## स्वाईन फ्लू महाविद्यालय विद्यार्थी बाबत माहिती

**अहवाल दिनांक --- / /०९**

| अ. क्र. | मुलाचे नांव | वय | वर्ग | महाविद्यालयाचे नांव | महाविद्यालयात शेवटी विद्यार्थी गेल्याचा दिनाक | लक्षणे सुरू झाल्याचा दिनांक | पॉझिटीव्ह आढळयाचा दिनांक | महाविद्यालयाचे स्क्रिनींग केल्याचा | | संशयीत आढलेली मुले | टमीफयू सुरू केल्याचा दिनांक | सद्यस्थिती घरी/ भरती असल्यास कुठे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | दिनांक | संख्या | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |